**“सप्टेंबर २०१९” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

**(क) मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त / प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन / पदोन्नती / पदावनती / मानीव दिनांक व नियमित दिनांक इत्यादींच्या आदेशांचा तपशील ...**

| बाब | नियुक्ती | बदली | | | | | | प्रतिनियुक्ती | | | पदोन्नती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संवर्ग | नियतवाटप | बदली | बदलीस मुदतवाढ | बदलीस स्थगिती | बदली रद्द | पदस्थापनेत बदल | कार्यमुक्त | प्रतिनियुक्ती | प्रत्यावर्तन | प्रतिनियुक्तीस मुदतवाढ | पदोन्नती | पदावनती | प्रपत्र बढती | प्रपत्र बढतीस मुदतवाढ | मानीव दिनांक | नियमित दिनांक | एकूण अधिकारी / कर्मचारी |
| भाप्रसे | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| कक्ष अधिकारी | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| अवर सचिव | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| सहायक कक्ष अधिकारी | ६४ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६५ |
| उच्चश्रेणी लघुलेखक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**(ख) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ३ सप्टेंबर २०१९ च्या शासन आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ करिता मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय (कार्यासन-३३), सामान्य प्रशासन विभाग यांसाठी ५ कक्ष अधिकाऱ्यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
- दिनांक ३ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम १९५४ मधील नियम-४(२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये Apex Scale : Level-17 in the Pay Matrix या संवर्गात दोन पदे तात्पुरत्या स्वरुपात दिनांक १ सप्टेंबर २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक ११ सप्टेंबर २०१९ च्या शासन आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ करिता मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय (कार्यासन-३३), सामान्य प्रशासन विभाग यांसाठी १२ सहायक कक्ष अधिकारी व ६ लिपिक-टंकलेखक यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
- दिनांक ११ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीची मार्गदर्शक तत्त्वे निश्तित करण्यात आली आहे.
- दिनांक १३ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जुलै २०१९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक १३ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील मर्यादित विभागीय परीक्षा २०१७ मधील मूळ निकालातून मागासप्रवर्गासाठी शिफारस झालेल्या ८ उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यासाठी खुल्या प्रवर्गात ८ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहे.

- दिनांक १६ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्या प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीमधून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे, / ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकरिता सन २०१९-२० करिता ५१७०० प्रशिक्षणार्थींचा अंतिम केलेल्या प्रशिक्षणच्या आराखडयाच्या रु.१० कोटी इतक्या प्रशासकीय प्रशिक्षणाच्या खर्चास काही अटींच्या अधीन राहून, प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २१ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील १८७ अस्थायी पदांना दिनांक २९ फेब्रुवारी २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(ग) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक ४ सप्टेंबर २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यामधील १६९ व काही Repeater सहायक कक्ष अधिकाऱ्यांसाठी सन २०१९ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा दिनांक २० व २१ सप्टेंबर २०१९ या कालावधीत सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.
- दिनांक १८ सप्टेंबर २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०१९ ला पुन्हा (Repeater) बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे अर्ज दिनांक १ ऑक्टोबर २०१९ पर्यंत पाठविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

**(घ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक २६ सप्टेंबर २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाच्या सन २००१ ते २००४ या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीची सुधारित तात्पुरती ज्येष्ठतासूची हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २७ सप्टेंबर २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २७ सप्टेंबर २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन अवर सचिव संवर्गाच्या सन १९९९-२००० ते २००३-२००४ या कालावधीच्या निवडसूच्या कक्ष अधिकारी संवर्गाच्या सुधारित ज्येष्ठता यादीनुसार, हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****